श्री. शितोळे संतोष रामदास, कनिष्ठ सहाय्यक, यांनी कार्यालयीन कामी गैरवर्तन केलेने विभागीय चौकशी सुरु करणेकामी सादरकर्ता व चौकशी अधिकाऱ्याची नेमणुक करणेबाबत.

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि/आस्था-३/५५८६०१/५२५/२०२५
अहिल्यानगर दिनांक २३/०६/२०२५

वाचा:- १. इकडील दोषारोपपत्र जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/३३२२/८६/२०२३ अहिल्यानगर दिनांक १८/०१/२०२३
२. श्री शितोळे यांना दोषारोप बजावलेची पोहोच दिनांक २६/०३/२०२५
३. वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र निघोज यांचेकडील पत्र जा.क्र.आस्था/४१/२०२५ दिनांक ०२/०५/२०२५
४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील ६ (५)

श्री. शितोळे संतोष रामदास, कनिष्ठ सहाय्यक, हे प्राथमिक आरोग्य केंद्र निघोज ता.पारनेर कार्यरत असताना कार्यालयीन कामी अनाधिकृत गैरहजर असलेने संदर्भ क्रमांक १ अन्वये ज्ञापन दोषारोप श्री. शितोळे यांना बजावणेत आले. संदर्भ क्र. २ अन्वये श्री शितोळे यांना सदर ज्ञापन/ दोषारोपपत्र बजावणेत आलेले आहेत. सदर्भ क्रमांक ३ अन्वये वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र निघोज यांनी श्री. शितोळे संतोष रामदास, कनिष्ठ सहाय्यक यांनी अद्यापार्यंत खुलासा सादर केलेला नाही असा अहवाल सादर केलेला आहे.

सबब, श्री. शितोळे संतोष रामदास, कनिष्ठ सहाय्यक, यांचेविरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने चौकशी करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ च्या तरतुदींनुसार खातेनिहाय चौकशी करणेचे निश्चित करण्यात आलेले आहे. त्यासाठी सदरची चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी, तथा सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि.प.कर्मचारी), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करीत आहे. तसेच विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागु राहतील.

तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ६ (५) अन्वये जिल्हा परिषदेची बाजु मांडणेकरिता सादरकर्ता अधिकारी म्हणुन श्रीम सविता अरुण कोतकर, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पंचायत समिती पारनेर यांची नेमणुक करण्यात येत आहे. सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे. त्याप्रमाणे संदर्भ क्रं.२ मध्ये नमुद केलेले आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची बाजु मांडावी.

..२

परिशिष्ट क्र तीन व चार मध्ये (दोषारोपपत्र) नमुद केलेले साक्षीदार यांना पुराव्याच्या कागदपत्रांसह चौकशीच्या दिवशी हजर ठेवावे. तसेच सोबत प्राथमिक कार्याचा करावयाचा तपशिल जोडला आहे. उक्त नमुद कामी हयगय झाल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेताक 20250623040109 ................ असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 21-06-2025 12:49:23
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. विभागीय चौकशी अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि.प.कर्मचारी), नाशिक विभाग,नाशिक. सोबत संबंधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र १ ते
२. श्रीम सविता अरुण कोतकर, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पंचायत समिती पारनेर
   व्दारा व प्रत- गट विकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर
   २/-सदर आदेशाची प्रत संबंधितास बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी. सोबत संबंधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र पान क्र. १ ते
३. श्री. शितोळे संतोष रामदास, कनिष्ठ सहाय्यक, प्रा.आ.केंद्र निघोज ता पारनेर
   व्दारा व प्रत:- वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र निघोज ता पारनेर
   २/-सदर आदेशाची प्रत संबंधितास बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.